जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर-30/2018
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांकः- 06.02.2019

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**सर्वसाधारण सभेची सूचना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनसूची ``ड`` चे प्रकरण-2 मधील नियम क्रं. 1 अन्वये

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची (ड) च्र प्रकरण-2 मधील नियम क्रं 1 अन्वये प्राप्त अधिकारानुसार **मा. महापौर, सौ. भवरे शिलाबाई किशोर** यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा **दिनांक 14.02.2019 रोजी दुपारी 03.00 वाजता नावाशमनपाकेच्या मुख्य प्रशासकिय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील कै. शंकरराव चव्हाण सभागृहात आयोजीत केली आहे.**

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी निर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

स्वाक्षरीत/-

**(मा. महापौर यांच्या मान्यतेने)**

**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**प्रति**
**श्री/श्रीमती -------------------------------**
**सदस्य /सदस्या,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**आयुक्त यांच्याकडून प्राप्त कार्यालयीन प्रस्ताव**

**विषय क्रं. 01**

दिनांक 19.07.2018 व 11.09.2018 रोजी मागील झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

**विषय क्रं. 02**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बाल कल्याण समितीच्या सदस्यांची मुदत दिनांक 30.12.2018 रोजी संपली असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे सुधारीत कलम 31(अ) मधील तरतुदीनुसार व महानगरपालिका व स्थायी समितीचे कामकाज नियमातील 4-ब नुसार पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बाल कल्याण समितीवर नामनिर्देशनाव्दारे 11 (अकरा) सदस्यांची नियुक्ती (स्थायी समितीवर नामनिर्देशनाव्दारे नियुक्त केलेल्या सदस्यांप्रमाणे) करणे बाबत. (1) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस चे तौलनीक संख्या बळानुसार 10 सदस्य (2) भारतीय जनता पार्टी चे तौलनीक संख्या बळानुसार 01 सदस्यांची नामनिर्देशनाव्दारे पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बाल कल्याण समितीवर नियुक्ती करणे बाबत.

**विषय क्रं. 03**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दी मध्ये घामोडीया फॅक्ट्री, डॉ. लेन नांदेड येथील वाहनतळाचा मक्ता तीन वर्षासाठी मक्ता श्री साजेद खान अय्युब खान यांना प्रती वर्ष 10 टक्के नैसर्गिक वाढ या प्रमाणे देणे बाबतचा प्रसताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 04**

श्री सय्यद बारी सय्यद महेबुब, कंत्राटी कुस्ती शिक्षक / प्रशिक्षक यांचे कंत्राटी सेवेस कंत्राटी सेवेत दिनांक 20.05.2018 रोजीचा तांत्रिक खंड देवुन दिनांक 21.05.2018 ते 29.06.2018 पर्यंत तसेच यानंतर दिनांक 30.06.2018 रोजीचा एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दिनांक 01.07.2018 ते 30.12.2018 पर्यंत कंत्राटी सेवेस पुढील मुदतवाढ देणे बाबत.

**विषय क्रं. 05**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी प्रथमिक शिक्षकांच्या सेवेस दिनांक 31.12.2018 रोजीचा एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दिनांक 01.01.2019 ते 29.06.2019 पर्यंत मुदतवाढ देणे बाबत.

**विषय क्रं. 06**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी माध्यमिक शिक्षकांच्या सेवेस दिनांक 31.12.2018 रोजीचा एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दिनांक 01.01.2019 ते 29.06.2019 पर्यंत मुदतवाढ देणे बाबत.

**विषय क्रं. 07**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी विजतंत्री यांच्या सेवेस दिनांक 31.12.2018 रोजीचा एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दिनांक 01.01.2019 ते 29.06.2019 पर्यंत मुदतवाढ देणे बाबत.

**विषय क्रं. 08**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांच्या सेवेस दिनांक 31.12.2018 रोजीचा एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दिनांक 01.01.2019 ते 29.06.2019 पर्यंत मुदतवाढ देणे बाबत.

**विषय क्रं. 09**

नांदेड वाघाळा शहर महानगरपाकेतील कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावरील एकूण 08 वैद्यकिय अधिकारी/सहाय्यक वैद्यकिय अधिकारी व कंत्राटी सिनिअर डॉटस प्लस TB HIV सुपरवायझर-1 असे एकूण 09 कर्मचा-यांचा सेवेस दिनांक 31.12.2018 रोजीचा एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन दिनांक 01.01.2019 ते 29.06.2019 पर्यंत मुदतवाढ देणे बाबत.

**विषय क्रं. 10**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रात तयबाजारी, आठवडी बाजार व दैनंदिन भाडे ( नो हॉकर्स झोन वगळुन ) वसुलीचा मक्ता ताबा दिनांकापासुन एक वर्षासाठी सर्वात जास्तीची अंतीम यशस्वी बोली श्री श्यामसुंदर बब्रुवान दळवे यांनी रुपये 82,00,000/- यांची एक वर्षासाठी नियम व अटीनुसार मक्ता देणेसाठी मनपा सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 11**

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लोकशाही पंधरवाडा साजरा करण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या पदाधिकारी / स. सदस्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांचे व त्यांचे निवडणुकाचे महत्व या बाबत सर्व स्तरावरील माहिती अवगत करणे  तसेच लोकशाही निवडणूका व सुशासन या संदर्भात जनजागृती व्हावी या दृष्टीने चर्चा सत्र आयोजीत करणे बाबत.

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**